# प्रसार माध्यमातील क्रीडाच योगदान

**डॉ. बालाजी लक्ष्मणराव शिंदे**
**वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख**
**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय**
**राणीसावरगांव ता. गंगाखेड जिल्हा परभणी**

एकविसाव शतक हे माहिती तंत्रज्ञानाच शतक म्हणून ओळखले जात आहे. विविध काम करण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग केला जात आहे. मात्र मानवाला तंदरुस्तीत राहण्यासाठी व्यायामाची आवश्यकता असते. त्याला थकल्यासारखं वाटत असल्यास वयोवृध्द झालो, अशी चाहुल लागते. या चाहुलमध्ये कोणतेही काम करीत नाही. मानवाला शरीर मजबुत आणि मानसिक परिस्थिती चांगली ठेवण्यासाठी खेळ, व्यायाम करणे आवश्यक आहे. खेळांच्या माध्यमातून मानावाचा स्वभाव तंदरुस्त राहु शकतो. जगातील बुध्दीजीवि असे म्हणतात की, मानवाने व्यायम केल्यास शरीर आणि मानसिक परिस्थिती चांगली राहु शकतो. माध्यमाध्ये काम करणा–यांना व्यायाम करणे हे अनिवार्य आहे. त्याचे कारण शरीर तंदुरुस्त राहिल्यास बारा–बारा तास काम करु शकतो. खेळ खेळण्यासाठी वयाची अट लागत नाही. त्यांच प्रमाणे माध्यमा मध्ये काम करण्यासाठी वय बघितले जात नाही. केवळ ज्ञानाची परिक्षा घेतली जाते. तो कितीही लहान किंवा मोठा व्यक्ति असो. या युगामध्ये खेळांडू खूप मेहनत घेवून बदलणा–या नियमाचे पालन करीत आहेत. देशासह जगात विविध स्पर्धा आयोजित करण्यात येत आहेत.

खेळांडूना योग्य दिशा, योग्य मार्गदर्शन, शिक्षण मिळाल्यास देश शिखरावर जाण्यासाठी वेळ लागत नाही. लहानपणापासूनच खेळांडू किवा क्रिडाची माहिती असावी, असे काही नाही. वयाने मोठा झाला. किंवा जिदी असला तर तो एक चांगला खेळांडू तयार होतो. खेळांडू आणि पत्रकार एकच नाण्याचा दोन बाजू होवू शकतात, असे म्हणायला काहीही हरकत नाही. माध्यम खेळांडूना प्रोत्साहित करीत असतात. इतर देशामध्ये माध्यम हे राजकीय,बडया लोकांसाठी कार्य करीत असतात. त्यांच्यासाठीच माध्यमे आहेत, अशी समज निर्माण झाली. ही

समज कालातराने बदलली पाहिजे. वृत्तमानपत्र हे धन धांडग्यांचेच होते. आजही पाच टक्के लोक वजा केले तर उर्वरित 95 टक्के वृत्तपत्रे ही श्रीमंताच्या मालकीची आहे. खेळांना वृत्तपत्रात जागा कमी देत असत. ती ही जागा वृत्तपत्राच्या आतील पानावर बातमी प्रकाशित केली जात असत. देशामध्ये खेळांडूना प्रोत्साहन दिले पाहिजे. अशी भावना वाटू लागली. त्यामुळे खेळांच्या बातम्या आणि छायाचित्रे प्रकाशित होत होती. 1896 साली 'डेली मेल' वृत्तपत्रात स्वतंत्र खेळांच पान प्रकाशित केले. तेव्हा विविधस्तरातून खेळासाठी संपूर्ण पान दिल म्हणून सर्वत्र टीका होवू लागली. या टीकेला न जुमनता 'डेली मेल' वृत्तपत्रानी आपले कार्य सुरुच ठेवले. त्याचा एक वाचक वर्ग तयार झाला. जगातील बहुतांश वृत्तपत्राचे संपादक हे वृत्तपत्रातील शेवटच पान हे क्रिडा पान म्हणून प्रकाशित करीत आहेत. मराठी वर्तमानपत्रातचा अभ्यास केला तर दोन पाने क्रिडाचे प्रकाशित करीत आहेत. खेळांची चांगली कामगिरी करणा-या खेळाडूची बातमी पहिल्या पानावर प्रकाशित करीत असतात. उदाहरण कब्बडी स्पर्धा, क्रिकेट, कुस्ती स्पर्धा, बुध्दीबळ, नेमबाजी आदी. खेळांची लोकप्रियता वाढत असे. इतर काही देशामध्ये चित्रपट दाखविण्यापूर्वी खेळांच्या बातम्या सांगितल्या जात असत. त्या पाठीमागच एकच कारण की, देशातील तरुणांनी खेळांकडे वळले पाहिजे. 1922 मध्ये बी.बी.सी. नभोवाणीच खासगी करण झालं. तेव्हा खेळासंबंधी बातम्या प्रसारण करण्यास निर्बंध होते. त्यानंतर बी.बी.सी. नभोवाणी ही सार्वजनिक कार्पोरेशन केले, तेव्हाही खेळांतील बातम्याचं प्रसारण सुरु करण्यात आले आहे. ब्रिटिशनी दुरदर्शनवरील पहिला फोटो दाखविण्यात आला आहे. तो फोटोचा रंग काळा-पाढंरा असा होता. आता माहिति तंत्रज्ञानामध्ये मोठा बदल झाला आहे. 1960 ते 2018 या दरम्यान विडिओ, रेका◌ॅर्डिग,एडिटिंग,संवाद सैटेलाइट, एक्सन रिप्ले, आदी सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. खेडया-पाडयात टी.व्ही., नभोवाणी आता सोशल मिडिया पोहचला आहे. देशामध्ये 1980 ला दुरदर्शन सुरु झाले आहे. त्यांनतर 1982 साली दिल्ली येथून विविध खेळांचे प्रसारण केले जात असत. खेडया-पाडयात सर्वत्र टिव्ही पोहचली नव्हती. मात्र गावात एक टिव्ही होती. त्या टिव्हीवर खेळांचे सामने पाहण्यासाठी नागरिकांची झुंबड उडत होती. त्यानंतर आठ वर्षांनंतर म्हणजे 1990 सालापासून चॅनेलची संख्या वाढविण्यात आली

आहे. यामध्ये खेळांची माहिती प्रसारित होत होती. कालातराने स्वतंत्र क्रिडा संबंधित चॅनलचे प्रसारण झाले. आजच्या घडीला देशातील नव्हे जगातील आयोजित सामाने घरी बसल्या-बसल्या आपण पाहु शकतो. मुद्रित माध्यम दकश्राव्य, दुरचित्रवाणी माध्यमानी खेळांना महत्व प्राप्त करुन दिले आहे. अमेरिकेने 1970 साली आकाशात पहिला कम्युनिकेशन सेटेलाईट सोडला तेव्हा जगातील खेळ दाखविले जात असत. त्यानंतर इतर देशानीही लाईव्ह टेलीका◌ॅस्ट सुरु केले. ब्रिटिश, अमरिका, युरोप, भारतामध्ये खेळांचे सामने प्रसारित होवू लागले. यामध्ये बोटावर मोजण्याऐवढे क्रिडाच्या बातम्या प्रसारित करीत असत. 1998 सालापासून अनेक चॅनेल चे प्रसारण झाले.

माध्यमामधून खेळांचे महत्व सांगितले जाते. ज्ञान, सुचना, महत्व उत्साहित केले जाते. खेळांचे नियम, खेळाविषयी माहिती, टीममधील माहिती, रेका◌ॅर्ड, भावनात्मक प्रभाव, तणाव-मुक्त कारण ही महत्वाच काम माध्यमामुळे होत असते. सर्वानाच मैदानावर जावून खेळ पाहणे अशक्य आहे. अशा नागरिकासाठी टि.व्ही. वरुन खेळ पाहणे कधीही चांगले. भारनियमन आपण बाहेरगावी असल्यास वर्तमानपत्रावरील बातमी वाचून माहिती मिळू शकते. माध्यम खेळांतून अनुभव,प्रसिध्दी, विचारधारा रुजवित असते. मैदानावरील सामाने झाले. ते प्रसारित करुन संशोधन करीत असते. प्रसार माध्यमानी खेळ घरा-घरात पोहचली आहेत. त्याला मनोरंजन, माहिती मिळविण्याच साधन म्हणून बघितले जात आहे. प्रसिध्द खेळांडू विषयी आत्मयिता मनामध्ये भावली आहे. उदयोगपतीही खेळांच्या पाठीमागे लागले आहे. आयपीएल मध्ये देशातील उदयोगपतीचा मोठा वाटा आहे. ही माहिती माध्यमामधून सर्व सामान्य वाचकापर्यंत येत आहे. खेळांडूला सुध्दा महत्व आलेले आहे. त्या महत्वाला पैसा प्राप्त झाला आहे. विविध खेळ विशिष्ठ वर्गासाठी प्रसार माध्यमाध्ये दाखविले जाते. गोल्फ खेळ हा उच्च वर्गातील खेळ म्हणून बघितले जाते. खेळ समाजाची सेवा करीत असतात. शाळा, महाविद्यालया, विद्यालयात खेळ खेळविले जातात. व्यक्तिमहत्व व विकास, कॅरियरला तारक असणारे खेळ घेतात. यातून विद्यार्थी घडला पाहिजे, पुढे चालून तणाव-मुक्त आणि सामाजिक कामासाठी उपयोगी

पडला पाहिजे. हेच ध्येय समोर ठेवून खेळ आयोजित केले जातात. त्याला, उत्साह,प्रोत्साहन देण्यासाठी माध्यम काम करीत असतात.

खेळ आणि प्रसार माध्यम ऐकमेकावर अवलंबून आहेत. खेळांना प्रसिध्द मिळवून देण्यासाठी माध्यमाचा सिहांचा वाटा आहे. खेळांच्या माध्यमातून प्रक्षेकांची संख्या जोडली गेली. खेळ आणि माध्यम एकमेंकाना मदत करुन दोघांचाही विकास झाला आहे. अनेक खेळांना प्रसिध्दीची आवश्यकता नाही. खेळांना महत्व प्राप्त झालं की, माध्यमाची भुमिका बदलती. त्या खेळांना सुगीचे दिवस येतात. वृत्तपत्र, दुरदर्शन सुरु होण्यापूर्वी पासून लो खेळ खेळीत असतात. आजची अनेक खेळ खेळीत असतात. त्याकडे माध्यम लक्ष देत नाहीत. भारतात क्रिकेटला महत्व असून माध्यमात क्रिकेटला प्राध्यान्य आहे. श्रीमंत क्रिकेटला महत्व असून माध्यमात क्रिकेटला प्राध्यान्य आहे. श्रीमंत क्रिकेटर ही आहे. यामध्ये माध्यमाचा सिहांचा वाटा आहे. प्रसार माध्यमातून टिकीट विक्री होते. दुरदर्शन कंपनी खेळ मोठया किंमतीला प्रसारणाचे अधिकाराची विक्री करीत असतात. यामध्ये कंपनीला आर्थिक फायदा मिळतो. खेळांडू हा मिडियाच्या माध्यमातून सैलिब्रिटि होतो. तो सैलिब्रिटी झाला की,पैसे कमविण्याच साधन मिळत असते. दुरदर्शवर खेळ प्रसारित केले जाते. खेळाशिवाय दुरदर्शन चालु शकत नाही. वृत्तपत्रेही खेळांच्या बातम्या प्रकाशित करीत असतात. ऐवढेच नव्हे तर ंखेळांविषयी दरवर्षी एखादी पुस्तक प्रकाशित होत आहे. खेळांविषयी पुस्तकांची चर्चा होत नाही. खेळांविषयी चित्रपट काढत असतात. त्याचे प्रमाण अल्प आहे. त्याचा प्रसार मात्र झपाटयाने होत असून भारतातील उदाहरण घेयायचे तर आमीर खानचा दंगल,धोनी,संचिन तेडुलकर, हाॅकी मास्टर ध्यानचंद इत्यादी.

नभोवाणीचा विचार केला तर हाॅकी आणि क्रिकेटची लाईव्ह काॅमैन्टरी असत. आजी त्याचा प्रभाव कमी झाला नाही. शहरीभाग वगळता ग्रामिण भागात नभोवाणीचा प्रभाव आहे. यावर बातम्या आणि खेळासंदर्भातील माहिती ऐकणारे नागरिक मोठया संख्यने आहेत. सोशल मिडियाचा वापर मोठया प्रमाणात सुरु आहे. खेळांसंदर्भात सर्वच माहिती इंटरनेटवर असल्याने ती माहिती पाहणे, वाचने,सोपे झाले आहे. प्रसारमाध्यम, सोशल मिडियामुळे खेळांच

वेळापत्रकांची माहिती होती. खेळ रात्री खेळले जात आहेत. 20-20 क्रिकेट सामना, व्हाॅलीबाॅल, हाॅफ टाईम आदी बदल करण्यात आला आहे. खासगीकरण्यामध्ये एक देश दुस-या देशामध्ये ये-जा करण्यासाठी खेळाच्या माध्यमातून जात असतात. खेळ हे सर्वच देशात आवडणारा प्रकार आहे. खेळात वैशिष्ट म्हणजे दोन देश एकत्र करुन वस्तुची विक्री करुन फायद होवू शकतो. खेळ पाहणा-यांची संख्या मोठी आहे. यामुळे दोन देशातील संबंध अधिक घट मजबुत होतात. प्रत्येक देशातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे, यासाठी खेळ महत्वाचा आहे. या खेळांना साथ माध्यमाची असली की तीचा प्रसार होतो. नागरिक हे जास्तीत-जास्त वेळ खेळांमध्ये व करमणुकीमध्ये रमत असतात.खेळ,मनोरंजन हा व्यवसाय मोठा झाला आहे. अनेक नागरिक खेळांवर पैसा लावत असतात. पैसा कमविण्याच माध्यम क्रिडा व दुरचित्रवाणी झालं आहे. केवळ मनोरंजन म्हणजेच दुरचित्रवाणी नाही तर माहिती ज्ञान मिळविण्याच म्हणून माध्यमाकडे बघितले जाते. देशातील माध्यम हे उद्योगपतीच्या हाती आहेत. खेळांचे प्रसारण करणे म्हणजे केवळ मनोरंजन होय. इतर देशाशी तुलना केली तर भारत देशातील खेळांची प्रगती झाली नाही. लोकसंख्येचा विचार केला तर स्वतंत्र असे वृत्तपत्र किंवा नभोवाणीवरील दिवस नाही. प्रसारामाध्यमांनी सुध्दा खेळांसंदर्भात जनजागृती करुन जास्तीत जास्त मुलांचा सहभाग वाढेल,यासाठी माध्यमानी पुढाकार घेतला पाहिजे.